VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DR COLLEGE

ISSN 2231-6671
International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH
# RESEARCH ANALYSIS

(UGC Approved Peer Reviewed Research Journal)

Year - VIII, Issue - XV, Vol.- IV | Impact Factor 3.92 (GRIFI) | Feb. 2018 To July 2018

Hi-Tech Research Analysis

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

Issue : XV, Vol. IV
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Challenges Before Co-Operatives in the use of Information Technology<br>**Dr. M. M. Patel** | 1 |
| 2 | A Bibliometric Study of the Doctoral Dissertations in the Subject of Marathi Submitted to the Marathi Department of Marathwada University Aurangabad<br>**A. P. Bhande** | 5 |
| 3 | Cpe Scheme is Boon for College Library<br>**S. B. Deshmukh** | 16 |
| 4 | Comparision of Intelligence Between M.P.Ed and M.Ed Students of Amravati University<br>**Dr. Omprakash Aneja, Ashokkumar Jaishanker Tiwari** | 19 |
| 5 | महात्मा फुले के समाजविषयक विचार<br>**तानाजी रामभाऊ बोराडे** | 25 |
| 6 | महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन<br>**डॉ. बी.एम. खामकर** | 27 |
| 7 | आरोग्याच्या अर्थशास्त्राच्या समस्या<br>**डॉ. दयानंद विश्वंभर शिंदे** | 30 |
| 8 | शिवाजी महाराजांचे कृषिविषयक धोरण<br>**डॉ. व्ही.जी. वसु** | 36 |
| 9 | अनुवाद : समस्या आणि उपाय<br>**डॉ. सुरेश व्ही. शिंदे** | 40 |
| 10 | महात्मा बसवेश्वरांची राज्य विषयक संकल्पना<br>**डॉ. रत्नाकर बी. लक्षटे** | 57 |



Scanned by CamScanner

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

10

# महात्मा बसवेश्वरांची राज्य विषयक संकल्पना

**डॉ. रत्नाकर बी. लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

## Research Paper - Poltical Science

राज्यशास्त्रातील अनेक संकल्पनांपैकी राज्य ही एक अतिशय महत्वाची संकल्पना आहे. राज्यसंस्थेचा उदय, स्वरुप,कार्य,राज्याची उद्दिष्टे या विषयी अनेक पाश्चिमात्य व भारतीय राजकीय विचारवंतानी विचार मांडले आहेत. १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी ही स्वतंत्र असा राज्यविषयीचा दृष्टीकोन वचनातुन स्पष्ट केला आहे. महात्मा बसवेश्वरांच्या काळातील राज्यसंस्था, सरंजामदार, धर्ममार्तंड व राजाच्या हातातील बाहुले होते. राजा व राज्याविषयी सर्वसामान्य जनतेत दैववादी सिध्दांत प्रचलित होता. जनता राजाकडे ईश्वराचा (भुपती) अवतार म्हणुन पहात असत. राजाला आमच्या कल्याणासाठी ईश्वरानेच पृथ्वीवर पाठवले आहे.

राजा ईश्वराचा अवतार आहे. राजाने त्याच्या मर्जीनुसार राज्यकारभार करावा. त्याच्या राज्यकारभाराविरुध्द बंड करण्याचा हक्क आम्हास नाही; अशी राजा व त्याच्या राज्याविषयी आंधळेपणाची भावना सर्वसामान्य जनतेत होती. कर आकारणे, कर वसुल करणे, बाह्य व अंतर्गत शत्रुपासून जनतेचे संरक्षण करणे ही प्रमुख कार्य राज्यसंस्थेची होती. तत्कालीन राज्य सरंजामदार, धर्ममार्तंड, पुरोहित, राजा इ. श्रेष्ठींच्या कल्याणाचा विचार करणारी होती. महात्मा बसवेश्वर दैववादी नसून मानवाच्या श्रम व बौध्दिक कौशल्यावर विश्वास ठेवणारे होते. त्यामुळे राज्यही ईश्वरनिर्मित संस्था आहे, या मतास त्यांचा विरोध असावा. राज्य उदयाच्या मानवनिर्मिती सिध्दांताचे समर्थन केले असावे. महात्मा बसवेश्वर लोकहितदक्ष, कर्तव्यपरायण व जनकल्याणकारी राज्यकर्ते आणि प्रशासक होते. बिज्जलाच्या राज्यात स्वतंत्र कल्याणकारी पर्यायी व्यवस्था निर्माण केली. म्हणून बसवेश्वरांनी

Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



राज्याच्या कल्याणकारी स्वरुपासच मान्यता दिली असे म्हणावे लागेल.

'कल्याणकारी राज्य' राज्यशास्त्रातील आधुनिक संकल्पना आहे. ज्याचा उदय पाश्चिमात्य राष्ट्रात झाला. भारताने कल्याणकारी राज्य संकल्पनेचा स्विकार पाश्चिमात्य राष्ट्राकडूनच केला. हे जरी खरे असले तरी भारतीय परंपरेमध्ये अशा पध्दतीचा विचारच झाला नाही असे म्हणता येत नाही. १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवता, नैतिकता, विवेकवाद, इहवाद, बुध्दिवाद इ. मुल्यांची जोपासना केली. हे सर्व मुल्य कल्याणकारी राज्याचीच मुल्ये आहेत. 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख व अधिकतम लोकांचे अधिकतम कल्याण' म्हणजे कल्याणकारी राज्य होय. कल्याणकारी राज्य निर्माण होण्यासाठी 'कसभर कनक वस्त्रातील एक धागा ! मानवा येई उपयोगा । असे मनी नच येई याची वाहतो आण।' अशी शपथ बसवेश्वरांनी घेतली. तीच शपथ भारतातील सर्व राज्यकर्त्यावर्गाने घ्यावी आणि स्वतःस कांचन, कामिनी, सत्तालोलुपता, भ्रष्टाचार व स्वार्थ इ. दुर्गुणापासुन दूर ठेवावे, अशी शपथ महात्मा बसवेश्वर बिज्जल दरबारात महामंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारताना घेतात आजच्या कल्याणकारी राज्यातील राज्यकर्त्याला हे प्रेरणादायी आहे.स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंच्या मते "सबके लिए समान अवसर प्रदान करना, अमीरों और गरीबों के बीच अन्तर मिटाना और जिवनस्तर को ऊपर उठाना लोकहितकारी राज्य के आधारभुत तत्व है." महात्मा बसवेश्वरांनी नेहरुंच्या वरील विचारांना कारकून ते महामंत्रीपदापर्यंत कार्य करताना प्राधान्य दिले.

महात्मा बसवेश्वरांनी धर्म, जात, वर्ण, वर्ग, वंश, लिंग, व्यवसाय, अथवा अन्य सामाजिक भेदभाव आणि त्यातुन निर्माण झालेल्या श्रेष्ठ-कनिष्ठ प्रवृत्तीच्या विरोधी विचार मांडले. बसवेश्वरांचे सामाजिक समता व हक्काचे विचार भारतीय संविधानातील कलम १४ ते १८ मधील विचाराशी मिळते जुळतेच आहेत. 'हा कोण, हा कोण, असे म्हणवू नका देवा. हा आमचा, हा आमचा, हा आमचा असे म्हणवावे देवा. कुडलसंगमदेवा. आपला घरचा पुत्र म्हणवावे मला." या वचनातुन मानवी मनातील व्यक्तिवाद व स्वार्थी विचारास तिलांजली देवुन उदारमतवाद, मानवतावाद व मानवीय प्रेमाचा विचार निर्माण होतो. बसवेश्वरांचा हा विचार कल्याणकारी राज्यातील सामाजिक आरोग्याच्या सदृढीकरणासाठी उपयुक्त ठरतो. आदर्श नागरिकाशिवाय कल्याणकारी राज्याची बांधणी करणे शक्य नाही. म्हणुन बसवेश्वरांनी जनतेच्या मनावर 'सदाचारच स्वर्ग, अनाचारच नरक' 'हत्या करणारा मांग, मांसाहार खाणारा महार' 'धरावा आग्रह सत्याचा' परधन व परस्त्रीपासुन दुर रहा' इ. लोककल्याणकारी विचार जनतेच्या मनावर बिंबवले. 'दया हेच धर्माचे मुळ' आहे. 'समर्पण हेच जीवन' आहे. ज्याने कष्टाने जमीन भिजवली तोच जगदगुरु झाला. 'गुरु लिंग व जंगमासाठी दासोह' करावा. गळयातील इष्टलिंगातून 'स्व' ला जाणावे. हे विचार मानवी ऱ्हदयात सदगुणांचे बीजारोपण करणारे आहेत. मानवा-मानवाप्रती कल्याणाचा विचार देणारे आहेत. अस्पृश्यता, सांप्रदायिकता,

Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR EDUCATION SOCIETY'S Dist.Nanded



शोषण, गुलामगिरी, दारिद्र्य इ. कल्याणकारी राज्याविरोधी विचारांना नष्ट करण्यात बसवेश्वरांचे वचन साहित्य उपयोगी ठरते.

'अस्पृश्य, शुद्र चारित्र्य संपन्न असेल तर त्यांच्या शेजारी रहाणे चांगले' हा विचार जनतेत समता व बंधुता निर्माण करुन ऱ्हदय परिवर्तन करणारा आहे. 'नको करु चोरी आणि नको हिंसा। क्रोध जाण,तैसा मारकाचे। नको करु घृणा आणि नको निंदा, नको खोटा धंदा दंभ गर्व। स्तुती आपुली ती,नको व्देष बुध्दी। आंतरबाहयशुध्दी हीच जाणी। बसवेश्वरांचा हा विचार कल्याणकारी राज्यातील जनतेची सामाजिक आचारसंहिता स्पष्ट करतो. अंतरंग व बहिरंग शुध्दतेचा विचार कल्याणकारी मानव, समाज व राज्यास पोषक आहे. 'सत्य बोलणे हाच देवलोक', 'अहो म्हणतो स्वर्ग' इ.विचार जनता व समाजाला परस्पर कल्याणाच्या माळेत गुंफणारे आहेत.

लोकशाही, समाजवाद, उदारमतवाद, सुशासन विवेकवाद ही कल्याणकारी राज्याची आधारभुत तत्वे आहेत. या तत्वाविरोधी असणाऱ्या सामाजिक,धार्मिक,राजकीय व आर्थिक तत्वप्रणालीस विरोध केला. 'कायक वे कैलास' व 'दासोह' या दोन विचारातून पृथ्वीलाच स्वर्ग व नंदनवन बनवण्याचा विचार मांडला. कल्याणकारी राज्यासाठी राज्यातील सर्व जनतेने कायक करावे. दुसऱ्यांच्या श्रमावर बसून खाऊ नये. स्वावलंबी नागरिक कल्याणकारी राज्याचा पाईक असतो. सत्य, शुध्द व नित्य कायक करण्यानेच जीवनाचे कल्याण होते. जीवनाला आनंदी बनवता येते. सर्व समस्यांचे परिहार कायकीवृत्तीतूनच होते. अनुभवमंटपातील प्रत्येक सदस्यास कायक करणे आवश्यक मानले. कायकहिनांना अनुभवमंटपातील प्रवेश नाकारला. कायकविहिन जीवन व्यर्थ मानले. कायकविहिन जीवन नरकसमान आहे. कायकविहिन जीवन राज्यास रसातळाला नेणारे मानले. दासोह माध्यमातून आर्थिक समतेला पुरक विचार मांडले. बसवेश्वरांची दासोह संकल्पना संपत्तीचा संग्रह, भांडवलवादीवृत्ती व उपभोगवादी (चंगळवादी) प्रवृत्तीस नष्ट करणारी आहे. संपत्ती कुण्या एकटयाच्या मालकीची नसुन संपुर्ण समाजाची असते. समाजातील कमकुवत, अंध, अपंग,दुर्बल व्यक्तिंच्या कल्याणाची जबाबदारी राज्यासोबतच राज्यातील धनदांडग्यांची आहे; असा विचार दासोहातुन व्यक्त होतो. संपतीसंग्रह संघर्ष व विनाशास कारणीभुत ठरतो. म्हणुन मानवाने संपत्तीचा संग्रह न करता, तिचा विनियोग मानवी कल्याणासाठी करावा. हाच खरा कल्याणाचा, विकासाचा मार्ग आहे. दिवसापुरती संपत्ती मिळविण्याचा संदेश बसवेश्वरांच्या वचन साहित्याने दिला. व्यक्तिमत्व विकास घडवुन सर्वांचे कल्याण व्हावे म्हणुन इष्टलिंगदेवोपासनेचा विचार मांडला. रामकृष्ण हेगडे (कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री) च्या मते "बसवेश्वर हे १२ व्या शतकातील समाजवाद व कायक महत्व विशद केलेले एक विभुतीपुरुष होय." सामाजिक व आर्थिक न्यायातुनच राजकीय न्यायाची बीजे पेरली जातात. राजकीय न्याय ही कल्याणकारी राज्याच्या पुर्ततेची महत्वाची बाब आहे. कल्याणकारी राज्य हे आदर्श नागरिक, आदर्श विचार व सुदृढ समाजाच्या बांधणीतुनच वास्तवात येते. स्वातंत्र्य, समता,

Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR · EDUCATION SOCIETY'S · Dist.Nanded



बंधुता, न्याय इ.तुन सामाजिक प्रजाप्रभुत्व व कायक दासोहातुन आर्थिक प्रजाप्रभुत्वास बळकटी प्राप्त होते. यामुळे १२ व्या शतकात सरंजामदारी व दैववादी राज्यसंस्थेस नाकारुन कल्याणकारी राज्याचे चित्र रेखाटले.

## संदर्भ सूची :-

१) संपादक डॉ.सुधाकर मोगलेवार (३० सप्टेबंर २००५) : वीरशैव विश्वकोष - खंड २. भ.म.ऊर्फ भाऊ अनवाणे, अ.भा.मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर.

२) सिध्दराम पुजारी (१० ऑगस्ट २००५) : वचन धर्मसार, बसव चेतन प्रकाशन, मिरज

३) डॉ.लोहीत डी. नायकर (प्रथमावृत्ती २००७) : बसव आणि मानवी हक्क, बसव समिती बेंगलोर.

४) डॉ.सुधाकर मेनकुदळे (२००९) : १२ व्या शतकातील आद्यसमाजसूधारक महात्मा बसवेश्वर - महाराष्ट्र बसव परिषद भालकी,.

५) डॉ. रवि श्रीवास्तव (२००६) : उत्तर आधुनिकता विभ्रम और यथार्थ, नॅशनल पब्लीशींग हाऊस, जयपूर एवं दिल्ली

६) डॉ. सुर्यकांत घुगरे (मे २००३) : जगतज्योती बसवेश्वर - महाराष्ट्र बसव समिती - नांदेड

७) डॉ.सुर्यकांत घुगरे (२०००) : वीरशैव व ईतर धर्म आणि समाज - साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज.

८) एम.चिदानंदमुर्ती - (अनुवादक - किंबहूने रविंद्र) (१९९१) : श्री बसवेश्वर - नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.

९) डॉ.सुधाकर मोगलेवार (प्रथमावृत्ती २००५) : मंगळवेढा - कल्याण - संगमाचा क्रांतीसूर्य शिवयोगी-बसवण्णा-आखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ - केशवराव बुटी रोड, सिताबर्डी, नागपूर.

१०) संपादक पुज्यश्री सद्‌गुरु माता नीलांबिकादेवी (ऑगस्ट २००१) : बसव दर्शन, विश्वशांती मिशन चॅरिटेबल ट्रस्ट - शरण साहित्य भंडार - न्यू उस्मानगंज रोड, रिसाल अब्दूल्ला, हैदराबाद.

११) प्रा.शंकरय्या कलीमठ (१९९५) : महात्मा बसवेश्वरांच्या राजकीय विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास-अप्रकाशित-एम.फिल.शोधप्रबंध-अमरावती विद्यापीठ..

१२) डॉ.अशोक मेनकूदळे (द्वितीयावृत्ती २००८) : आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर - महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी

१३) संपादक - प्रा.बी.बी.पाटील, प्रा. विजयकूमार करजकर (प्रथमावृत्ती २००६) : युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर - श्री ब्रम्हाजीराव भीमराव पाटील. मु.किनी (कदू) पो.सावरगांव

Scanned by CamScanner

(थोट) ता.अहमदपूर जि.लातूर.

१४) प्रा.डॉ.प्रभाकर पाठक (प्रथमावृत्ती २००५) : चेतनाचिंतामणी-श्री बसवेश्वर-सुविद्या प्रकाशन-सोलापूर.

१५) प्रा.डॉ.प्रभाकर पाठक (प्रथमावृत्ती-२००५) : चेतनाचिंतामणी-श्री बसवेश्वर-सुविधा प्रकाशन-सोलापूर.

१६) डॉ.काशिनाथ अंबलगे (प्रथम संस्करण-२००६) : बसवेश्वर काव्यशक्ति और सामाजिक शक्ती-लोकभारती प्रकाशन-नवी दिल्ली.

१७ डॉ.अमर सोलापूरे (प्रथमावृत्ती-२००७) :बसव दर्शन इंदू पब्लिकेशन्स-औरंगाबाद.

१८) संपादक - राजा शिरगुप्पे (प्रथमावृत्ती २००८) : सम्यक विद्रोही (बसवण्णा, कबीर, तुकोबा विशेषांक)-शिवानंद शिरगुप्पे-विद्रोही सांस्कृतिक चळवळ,महाराष्ट्र.

१९) संपादक - उत्तमकूमार कांबळे (२०००) : लोककैवारी चार्वाक विशेषांक- लोककैवारी प्रकाशन-देगलूर.

२०) कृष्णा मेनसे (तृतीयावृत्ती २००५) : श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर - एक चिंतन - लोकवाड्मय गृह, मुंबई.

२१) संपादक - डॉ.एम.बि.कोट्रशेट्टि (प्रथमावृत्ती - १९७६) : भक्ति भंडारी बसवेश्वर के वचन - कन्नड अध्ययनपीठ कर्नाटक विश्वविद्यालय - धारवाड.

२२) चंद्रशेखर वस्त्रद (अनुवादक-डॉ रत्नशिला गुरुड्डी,प्रा.संध्या देशपांडे) (प्रथमावृत्ती २००७) : मानवतावादी बसवण्णा-डॉ. चंन्नबसव पट्टदेवरु प्रतिष्ठाण - हिरेमठ संस्थान भालकी

२३) एम.चिदानंदमूर्ती (अनुवादक - रविंद्र किम्बहूणे) (१९९१) : श्री बसवेश्वर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली.

२४) राजेंद्र जिरोबे (१९८३) : बसवेश्वरी वचनामृत - श्री मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, मुंबई.

२५) अॅड.जे.के.पाटील (१९९६) : महामानव बसवेश्वर : ऐतिहासिक चरित्र व वीरशैव धर्म - कन्नड संशोधन संस्था कर्नाटक विद्यापीठ धारवाड.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner